## पुस्तक ओळख

**शिवाजी मोटेगावकर**

पुणे
भ्र. ९८८१ ०३९ ६२१

# साठ वर्षांच्या साम्यवादी संघर्षाचा इतिहास



कॉ. गोविंद पानसरे अमृत महोत्सव समिती व मुंबई गिरणी कामगार युनियन यांच्या वतीने 'मंजिल अजून दूरच' हे कॉ. गंगाधर चिटणीस लिखित पुस्तक त्यांच्या आठवणींचा संग्रह या स्वरूपात अलीकडेच प्रकाशित झालं आहे. सामाजिक चळवळीच्या अंताची चर्चा, संसदीय राजकारणाला प्राप्त झालेले अवास्तव महत्त्व, मार्क्सवादी विचारांची पोथीनिष्ठता व साम्राज्यवादाचं नवस्वरूप या पार्श्वभूमीवर पुस्तक प्रकाशित होणं हे कामगार चळवळीला प्रेरणादायी ठरणार आहे. एकूणच पुस्तक म्हणजे केवळ चिटणीसांच्या आठवणी नसून मुंबईतील गिरणी कामगार व गिरणगाव यांच्या साठ वर्षाहून अधिक काळातील संघर्षाचा इतिहास आहे.

कॉ. गंगाधर चिटणीस हे १९५२ पासून भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सदस्य व मुंबई गिरणी कामगार युनियनचे पुढारी म्हणून मध्यवर्ती यंत्रणेत वावरत होते. मुंबईतील कामगार चळवळ, या चळवळीवर असलेला कम्युनिस्ट विचाराचा प्रभाव व कामगार चळवळीचा अंत याचे ते प्रत्यक्ष साक्षीदार राहिलेले आहेत. तसेच गेल्या ६० वर्षात भारतीय राजकारणात घडलेल्या घटना चिटणीसांनी अतिशय जवळून पाहिल्या आहेत. १९८३ साली गिरणगाव कामगार चळवळीच्या इतिहासात सर्वात प्रदीर्घ म्हणून गाजलेला डॉ.दत्ता सामंतांच्या नेतृत्वाखालील संप फसला व पुढे संपूर्ण गिरणी कामगार चळवळच लोप पावली. केवळ कामगार चळवळच नाही तर कामगार वर्गही उद्ध्वस्त झाला. गिरण्या बंद पडल्या. भारत सरकारने १९९१ साली नव्या आर्थिक धोरणाचा स्वीकार केला व भांडवलशाहीने नवं रूप धारण केले. गिरणी मालकांनी गिरण्या मोडीत काढल्या. त्या ठिकाणी उभी राहिली पंचतारांकीत हॉटेलं, व्यापारी केंद्रं, मॉल्स इत्यादी. गिरण्या बंद पडल्या, गिरणी कामगार संपला व संघर्षाच्या एका पर्वाचा अंत झाला. असे का झाले? मुंबईतील गिरणी कामगार चळवळ का संपुष्टात आली? ध्येयनिष्ठ कम्युनिस्ट कार्यकर्ते व त्यांची प्रबळ अशी विचारसरणी यांचा पाडाव का झाला? या संपूर्ण ऱ्हासपर्वाचा उलगडा चिटणीसांच्या आठवणीतून करता येतो.

पुस्तकातील तपशीलांकडे वळण्यापूर्वी चिटणीसांचा कम्युनिस्ट पक्षप्रवेश कसा झाला हे पाहणे अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे. कारण सर्वसाधारणपणे

कम्युनिस्ट पक्षात येणाऱ्या व्यक्तींना निश्चित अशी पार्श्वभूमी असते. पण चिटणीसांचा पक्षप्रवेश हा त्यास अपवाद आहे. महाविद्यालयीन जीवनात झपाटून वाचलेली मार्क्स - एंगल्स - लेनिनची पुस्तके आणि स्वत:साठी वा कुटुंबासाठी जगावयाचे नाही तर समाजासाठी व देशासाठी जगावयाचे या निश्चयातूनच चिटणीस सरकारी नोकरीचा राजीनामा देउन कम्युनिस्ट पक्षात दाखल झाले. पण कम्युनिस्ट पक्षप्रवेश ही सहजसोपी गोष्ट नव्हती. एकूणच कम्युनिस्ट पक्ष हा विशिष्ट विचारप्रणालीवर व ध्येयावर निष्ठा ठेवून काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा पक्ष होता. त्यामुळे कार्यकर्ता पक्षसंघटनेत काम करून पूर्ण तयार झाल्यावरच त्याचा पक्षप्रवेश निश्चित होई. चिटणीसांनाही या संक्रमणातून जावे लागले. सरकारी नोकरीचे त्यागपत्र दिल्यानंतरही तब्बल एक वर्ष पक्षसंघटनेत काम केल्यानंतर त्यांना भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सभासदत्व प्राप्त झाले. कॉ. श्रीपाद अमृत डांगे हे भारतीय कम्युनिस्ट पक्षातील मोठं व्यक्तिमत्व. मुंबईतील गिरणी कामगार चळवळ मजबूत करण्यात डांगे यांचा मोलाचा वाटा होता. त्यांचा संप चालवण्याचा अनुभव दांडगा होता. कामगार हक्कासाठी गिरणी मालकांविरूद्ध संप पुकारणे, डावपेचाच्या पातळीवर तो चालविणे व निश्चित वेळी तो माघारी घेणे या बाबतीत डांगे अतिशय मातब्बर होते. चिटणीसांना सुरुवातीपासूनच कॉ. डांगेचा सहवास लाभला. तसेच त्यांची डांगेवरील असीम निष्ठा सर्वज्ञात होती. भटींडा (पंजाब) परिषदेनंतर डांगे पक्षातून बाहेर पडले तरीही चिटणीसांची डांगेनिष्ठा कायम राहिली. पक्षांतर्गत अनेक लोकांनी त्यांना डांगेवादी म्हटले पण त्यांना त्याबद्दल कधीही वाईट वाटले नाही. कारण डांगेवाद हा काही व्यक्तिवाद नव्हता तो एक कम्युनिस्ट विचारप्रवाह होता.

चिटणीसांनी युनियनमध्ये काम करताना भांडवलदार मालकाविरोधीचे, कामगाराच्या हक्कासाठीचे पुष्कळ लढे लढले. कामगार चळवळीचा भाग बनून, अनेक संघर्ष करून, बऱ्याच आहुती देऊन त्यांनी कामगारांना आर्थिक व संघटनात्मक विजय मिळवून दिले. संपूर्ण गिरणगावात लाल बावट्याचा प्रभाव निर्माण केला. कामगार प्रश्न व लाल बावटा हे समीकरणच गिरणगावात तयार झाले. हा विस्मृतीच्या गर्तेत जाऊ पाहणारा गिरणगाव व गिरणीकामगारांच्या चळवळीचा इतिहास चिटणीसांनी मोठया परिश्रमाने जिवंत केला आहे. पण पुस्तकाचा तपशीलवार आढावा घेतला तर हा संपूर्ण लेखन प्रपंच चार पातळीवर समजून घेता येतो.

एक, गेल्या साठ वर्षाच्या काळात भारतीय राजकारणात घडलेल्या घटनांना कम्युनिस्ट पक्षाने दिलेल्या प्रतिक्रिया, पक्षांतर्गत मतभेद व विभाजन याचे सविस्तर विवेचन पुस्तकात आले आहे. विचारप्रणालीशी व ध्येयाशी कम्युनिस्टांची असलेली प्रबळ निष्ठा यामुळे अनेक आघाडयांवर अपयश येऊनही कम्युनिस्ट पक्ष भक्कमपणे उभा राहिला. पण अंतर्गत मतभेदांमुळे पक्षाची शकले मात्र पडली. या पक्षांतर्गत मतभेदाची चर्चा चिटणीसांनी तटस्थपणे केली आहे. त्यात १९४२ च्या आंदोलनाला कम्युनिस्टांनी केलेला विरोध, चीनचे आक्रमण, आणीबाणीला पाठिंबा देण्याची पक्षाची भूमिका याचे विस्तृत विवेचन ग्रंथात आले आहे. चीनच्या आक्रमणाने पक्षांतर्गत मतभेद होऊन साहसवाद्यांचा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष स्थापन झाला. तर आणीबाणीला पाठिंबा देण्याच्या पक्षाच्या भूमिकेमुळे डांगेवादी गटाचा पराभव झाला व डांगे पक्षाबाहेर फेकले गेले. मार्च १९८० रोजी कॉ. डांगे यांची कन्या रोझा देशपांडे आणि जावई बानी देशपांडे यांनी ऑल इंडिया कम्युनिस्ट पार्टीची स्थापना केली. डांगे ऑल इंडिया पार्टीत गेले व सरचिटणीस झाले. त्यामुळे भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष व ऑल इंडिया कम्युनिस्ट पार्टी हे मार्क्सवादी विचाराचे तीन प्रवाह निर्माण झाले.

दोन, १९६६ साली झालेली शिवसेनेची स्थापना ही काही आकस्मितपणे घडणारी घटना नव्हती. शिवसेनेच्या स्थापनेनंतर मुंबई गिरणगावात कम्युनिस्ट व शिवसेना यांच्यात वर्चस्वासाठीची लढाई सुरू झाली. त्यात शिवसेनेला सत्ताधारी कॉंग्रेसचा सतत पाठिंबा राहिला. कॉंग्रेसलाही गिरणगावातील कम्युनिस्ट वर्चस्व संपवायचे होते. त्यासाठी त्यांनी शिवसेनेचा रितसर वापर करून घेतला. त्यातूनच गिरणगावात कम्युनिस्ट व शिवसेना यांच्यातील संघर्ष नित्याचा बनला. या संघर्षाचा पहिला बळी ठरला तो कॉ. कृष्णा देसाई. या संपूर्ण घटनाक्रमाचा आढावा चिटणीसांनी त्यांच्या आठवणीत घेतला आहे. कृष्णा देसाईची हत्या ही कम्युनिस्टांची हार नव्हती तर हत्येनंतर झालेल्या पोटनिवडणुकीत कृष्णाची पत्नी सरोजिनी देसाई यांच्या पराभवातच डाव्या विचाराची हार होती. यावरून हे सिद्ध होते की गिरणगावातील कामगारांनी आर्थिक प्रश्न सोडवण्याचे माध्यम या मर्यादित चौकटीतच कम्युनिस्ट व लाल बावट्याकडे पाहिले पण राजकीय सत्ता मात्र शिवसेनेकडे दिली. चिटणीसांनीही कृष्णा देसाईच्या हत्येनंतर गिरणगावात वाढत चाललेल्या शिवसेनेच्या प्रभावाकडे दुर्लक्ष केले आहे.

चिटणीसांनी पुस्तकात चर्चिलेली तिसरी महत्त्वपूर्ण घटना म्हणजे १९८२ चा डॉ. दत्ता सामंतांचा संप. सामंतांचा संप ही गिरणगाव कामगार चळवळीच्या

इतिहासातील महत्त्वपूर्ण घटना होती. कम्युनिस्ट पक्षातील अंतर्गत मतभेद व लाल बावट्यांच्या लढयास आलेले शैथिल्य यामुळे निर्माण झालेल्या अवकाशात डॉ. दत्ता सामंतांचे नेतृत्व उभे राहीले. त्यांनी अनेक संप लढवले व जिंकलेही. त्यामुळे सामंत अतिशय कमी कालावधीत गिरणी कामगारांचे आशास्थान बनले. जानेवारी १९८२ च्या संपाचे नेतृत्व जरी सामंताकडे असले तरी संप लढला जावा ही कामगारांची इच्छा होती. जवळपास एक वर्षाहून अधिक काळ संप चालला. संपाची तीव्रता प्रचंड होती. संपाच्या काळात तो मिटला जावा यासाठी अनेक प्रयत्न झाले. पण संप चालवताना सामंतांनी डावपेच व रणनीतीच्या पातळीवर अनेक चुका केल्या. त्यात त्यांनी संपाच्या काळात गिरणी कामगारांना आपल्या घरी परतण्यास सांगितले. त्याचा परिणाम असा झाला की संतप्त कामगार काही अनर्थ व हिंसक कृत्य करील याची भीती सरकारला राहिली नाही. दुसरी गोष्ट अशी की एस.एम.जोशी सारख्या समाजवादी नेत्याकडून वाटाघाटीसाठीचे प्रयत्न झाले पण सामंतांनी त्याला दाद दिली नाही. ते डावपेचात्मक राजकारण व रणनीती आखण्यात कमी पडले. तिसरी बाब म्हणजे त्यांचा ताठर स्वभाव. ज्यामुळे त्यांनी संपाच्या काळात गिरणगावातील इतर एकाही संघटनेला विचारात घेतले नाही. त्यामुळे संप एकतर्फी बनला.

अडीच लाख कामगार वर्षभर संपावर राहिले. कामगारांची प्रचंड संख्या, त्यांची अभेद्य एकजूट याचा अंदाज सामंतांना आला नाही. काहीच निष्पन्न होत नाही हे जाणून कामगार कामावर परतायला लागले. सत्ताधाऱ्यांनीही संपाची तीव्रता ओळखली होती व संप शेवटच्या घटका मोजत आहे जाणले होते. शेवटी गिरणी मालक संघाच्या व अनेक गिरण्यांच्या नोटीसा वृत्तपत्रातून प्रसिद्ध झाल्या की १ मे १९८३ च्या आत कामगारांनी कामावर रूजू व्हावे अन्यथा त्यांना कामावर घेतले जाणार नाही. त्यापूर्वीच कामगार गिरण्याकडे परतू लागले होते. १ मे १९८३ ला जगाच्या दृष्टीने संप संपला. सामंत मात्र संप सुरूच आहे असे म्हणत राहिले.

संप संपल्यावरही संपाच्या यशापयशाची चर्चा गिरणगावातील कामगारात सुरूच होती. कारण संपाची व्यापकता गिरणगावापुरती मर्यादित नव्हती तर तो देशभरातील भांडवलशाहीविरोधीचा लढा होता. सामंताच्या संपामुळे कापड गिरण्या बंद पडल्या अशी एक समजूत लोकात पसरली होती. पण केवळ मुंबईतीलच नव्हे तर अहमदाबाद, सोलापूर, कानपूर या ठिकाणच्या गिरण्याही बंद पडल्या. त्याची कारणे वेगळी होती. भांडवलदारांना गिरण्या बंदच करायच्या होत्या. शासनाने स्वीकारलेल्या नव्या आर्थिक धोरणामुळे भांडवलदारांना गुंतवणुकीचे नवे क्षेत्र उपलब्ध झाले होते. साम्राज्यवादाचा नवा चेहरा पुढे येऊ लागला होता. वित्तीय भांडवलवाद आला होता. तसेच कापड उद्योगातून मिळणारा नफाही कमी झाला होता.

पुस्तकाचे शेवटचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे मुंबई गिरणी कामगार युनियनमधील दुसऱ्या व तिसऱ्या फळीतील कार्यकर्ते व नेत्यांची चिटणीसांनी दिलेली माहिती होय. बहुतांश वेळी नेतृत्वाची चर्चा होते पण कार्यकर्ते दुर्लक्षित राहतात. चिटणीसांना याची जाणीव असल्यामुळे त्यांनी युनियनमधील कार्यकर्ते व नेते यांचे व्यक्तीचित्रण आणि त्यांचे चळवळीतील योगदान यावर प्रकाश टाकला आहे.

गिरणी कामगारांचे वेगवेगळे लढे, कार्यकर्त्यांचा सहभाग व विविध लढयांचे चित्रण उभे करतानाच गेल्या साठ वर्षाच्या काळात कम्युनिस्ट पक्षाने केलेल्या आणि पक्षाला भोवणाऱ्या अनेक चुका त्याच्या गंभीर परिणामासह वेळोवेळीच्या प्रसंगानुसार समोर ठेवल्या आहेत. त्यामुळे असे म्हणता येईल की भारतीय कम्युनिस्ट पक्षाशी संबंधित व्यक्तींनी आजपर्यंत जे लेखन केले त्यातून या चुकांची प्रत्यक्षाप्रत्यक्ष कबुली आढळत असली तरीही आत्मटीका, कठोर आत्मपरीक्षा अभावानेच येते, बहुधा आत्मसमर्थनाचाच खटाटोप दिसून येतो. पण कॉ. चिटणीस याला अपवाद ठरतात. गिरणगाव उध्वस्त झाले, कामगार उद्‌ध्वस्त झाला अन् मागे राहिला तो फक्त इतिहास. याच गिरणगावातील संघर्षाच्या इतिहासाला नवा अर्थ चिटणीसांच्या 'मंजिल अजून दूरच' या ग्रंथरूपी आठवणींनी मिळणार आहे. इतिहास लिहिण्यापेक्षा इतिहास घडविण्याची इच्छा चिटणीसांची होती. पण त्यांच्या इतिहास लेखनातून इतिहास घडविणारी एक पिढी निर्माण होईल अशी आशा बाळगूया. ◆

---

मंजिल अजून दूरच, कॉ.गंगाधर चिटणीस, २००९, लोकवाङ्मय गृह प्रा.लि., पृ. ४८८ मूल्य ३५० रु.

---

संदर्भ (पान १८ वरून)

१. मुंडा, रामदयाल आणि संजय बसु मलिक, २००३, झारखंड मुव्हमेंट, रांची, इग्वा अँड बिरसा पब्लिकेशन.

२. मलिक, संजय बसु, २००६, जंगल की जंग, रांची, बिरसा.

३. प्रकाश, अमित, २००१, झारखंड : पॉलिटिक्स ऑफ डेव्हलपमेंट एंड आयडेंटीटी, न्यू दिल्ली, ओरिएंट लॉगमॅन लिमिटेड.

४. डुंगडुंग, ग्लैडसन, २००९, उलगुलान का सौदा, रांची, झारखंड इंडिजिनस पीपल्स फोरम.

५. जेविअर कुजूर यांच्याशी चर्चा